## एतदर्थ मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षाः-

**या परीक्षा कोणाला देणे आवश्यक आहे :-**

शासन अधिसूचना क्र.टलेप्र-१०८१/सीआर-३४४/२०ब, दिनांक ६ मे, १९९१ अनुसार शासन सेवेतील इंग्रजी लघुलेखक, लघुटंकलेखक यांना एतदर्थ मंडळाची ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन व ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन व इंग्रजी लिपिक टंकलेखक यांना ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन परीक्षा सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १००८/१०५३/प्र.क्र.१३३/०८/२० ब, दि. ४.२.२००९ अन्वये मराठी टंकलेखन परीक्षा यापुढे संगणकावर घेण्यात येणार आहेत.

दिनांक ६ मे,१९९१ अनुसार घेण्यात येणारी मराठी टंकलेखन परीक्षा ऑक्टोबर,२०१२ मध्ये शेवटची परीक्षा आयोजित झाल्यानंतर घेण्याचे बंद करण्यात येणार आहे.

(पहा. शासन निर्णय क्र.संकीर्ण १००८/१०५३/प्र.क्र.१३३/०८/२० ब, दि.२०.६.२००९)

**परीक्षेतून सूट मिळण्याबाबतची तरतूदः-**

इंग्रजी लघुलेखक/टंकलेखक इत्यांदीना त्यांच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय आहे.

**परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास/सूट न मिळाल्यास दंडाबाबतची तरतूदः-**

जे इंग्रजी लघुलेखक, टंकलेखक विहित मुदतीत उपरोक्त परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांच्या विहीत मुदतीनंतर ते परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेपर्यंत त्यांच्या वार्षिक वेतनवाढी रोखून ठेवण्यात येतील.

अशा प्रकारे रोखून धरलेल्या वेतनवाढी शासकीय कर्मचारी ज्या दिवशी परीक्षा उत्तीर्ण होईल किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल त्या तारखेला देय होतील. आणि जणूकाही त्यांच्या वेतनवाढी रोखल्या नव्हत्या असे समजून त्या उपर्जित होतील परंतु थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

* * *